**नियमित दिवाणी दावा क्रमांक ३२३/२०१२**
**निशाणी क्रमांक ७७/ सोबत**

**प्र.वादी यांचे विधिज्ञ यु.आर.पाटील यांचेमार्फत शपथेवर उलटतपास सुरूः-**

मी सिव्हील इंजिनीयर म्हणून वरदलक्ष्मी कन्स्ट्रकशन प्रा.लि.कोल्हापूर येथे नोकरी करतो. माझ्या कामाची वेळ सकाळी ७ ते संध्याकाळी ५ पर्यंत ठरलेली आहे. मला साप्ताहिक सुट्टी रविवारी असते. संजय आण्णा परीट माझे मामा आहेत व ते शिरोली एमआयडीसी कंपनीमध्ये कामाला होते. त्यांची साप्ताहिक सुट्टी सोमवारी असते.

प्र.वादी यांचे वडील कै. वसंत यादव यांनी श्री. हनुमान ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था नागाव यांच्याकडून घेतलेल्या रक्कम रूपयाला (२,३३,३९२ /- ) मी साक्षीदार, जामीनदार व सहकर्जदार नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी साक्षीदार, जामीनदार व सहकर्जदार नसल्यामुळे प्रतिवादी यांचे वडील यांना पतसंस्थेला पैसे देणे लागू होते किंवा कसे याची मला वैयक्तीक माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रतिवादीला त्याच्याकडे कर्ज भागवण्याची आर्थीक परिस्थती आहे किंवा कसे हे मी वैयक्तीक विचारलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, तसेच कर्ज भागवण्याची त्यांच्याकडे पैश्याची तरतूद होती किंवा कसे याची मला वैयक्तीक माहिती नाही.

हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मामांनी प्र.वादी नं.१ यांना मदत करण्याकरीता श्री. हनुमान ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था नागाव यांच्याकडून रक्कम रू. २,६५,००० /- स्वत: कागदपत्रासकट कर्जप्रकरण करावे लागले याला मी साक्षीदार, जामीनदार व सहकर्जदार नाही. मी माझ्या मामांनी काढलेल्या कर्जाचे कागदपत्र पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे त्यांनी कर्ज कश्यासाठी काढले याची मला वैयक्तीक माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळेस प्रतिवादीनी वडीलांच्या नावाचे कर्ज भागवले त्यावेळेस मी संस्थेत हजर नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने त्यांच्या वडीलांचे कर्ज भागवले आहे.

हे म्हणणे खरे आहे की, रक्कम रू. २,६५,००० पैकी रक्कम रू. १०,००० दि.२०/०१/२००९ रोजी माझ्या समक्ष श्री. माणीक तानाजी सांवत यांच्या समक्ष हाती रोख स्वरूपात वादी यांना कुठे व किती वाजता दिली हे माझ्या शपथपत्रामध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीने रक्कम दिली नसल्यामुळे माझ्या शपथपत्रामध्ये ती रोख रक्कम कुठे व किती वाजता दिली हे नमूद नाही. मला दि.२०/०१/२००९ रोजीचे वार सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.२०/०१/२००९ रोजी मी कामावर हजर होतो. हे म्हणणे खरे नाही की, प्र.वादीनी वादी यांना नागाव येथे रक्कम माझ्या व तानाजी सावंत यांच्या समक्ष दिलेली होती हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माणीक सावंत हे वादी यांच्या नोकरीच्या ठिकाणी नोकरी करत असलेले इसम ते दोघे आले होते व उर्वरीत रक्कम रू.२,५५,०००/- पुढील २ वर्षांच्या कालावधीत थोडी थोडी देवून सर्व रक्कम भागवण्याचे प्रतिवादी नं.१ यांनी मान्य व कबूल केले होते व आहे हे मी खोटे सांगत आहे.

हे म्हणणे खरे नाही की, रक्कम रू. १०,०००/- हे कोणत्या नोटांच्या स्वरूपात दिले होते हे मला सांगता येणार नाही. मी प्रतिवादी नं.१ यांचे वारस म्हणून नावाचे कागदपत्र स्वत:हून पाहिलेले आहे परंतू मला त्याच्या घराचा सि.स.नं, गट नंबर व क्षेत्र सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी ते कागदपत्र पाहिले नसल्यामुळे मला घराचा सि.स.नं, गट नंबर व क्षेत्र सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी हा वादीला रक्कम रू.२,५५,०००/- इतकी रक्कम देणे लागतो हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा मामाला मदत करण्याकरीता आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी व प्रतिवादी मध्ये कोणत्याही प्रकारचा करार ठरला नव्हता हे मी खोटे सांगत आहे.

**उलटतपास संपला.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

sd/-

**दिनांक - १२/०३/२०२६.**
**ठिकाण - पेठवडगाव.**

**( आर. एस. मोरे )**
**३रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**
**पेठवडगाव.**